RNI No. MAHBIL 2012/47976

www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ०४ ] शनिवार, सप्टेंबर २७, २०२५ / आश्विन ५, शके १९४७ [ पृष्ठे ३

## असाधारण क्रमांक ०४

## प्राधिकृत प्रकाशन

**महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे यांजकडून**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० चे तरतुदीसह कलम २३, २६ आणि २८, तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण तरतुदी अधिनियम, १९०४ च्या कलम २१ अंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रारूप विकास योजना आराखड्यासंबंधित अधिसूचना व कार्यवाही रद्द करणे.*

### अधिसूचना

क्रमांक पीएमआरडीए/नि.वि./प्र.क्र.७०५/२०२५.— ज्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २३ *(१)* अन्वये उक्त महानगर क्षेत्राची प्रारूप विकास योजना तयार करण्याचा इरादा ठराव क्रमांक २, दिनांक २२ जून २०१७ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक ६ जुलै २०१७ रोजी प्रसिद्ध केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२, दिनांक ३० जून २०२१ अन्वये त्यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये नमूद एकूण महसुली गावांचा (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त २३ गावे" असा करण्यात आला आहे) पुणे महानगरपालिका हद्दीत समावेश करून पुणे महानगरपालिकेची हद्द सुधारित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४० *(१)* व कलम ४० *(१) (ध)* अन्वये प्राप्त अधिकारांचा उपयोग करून राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८२१/११६७/सीआर-९८/२०२१/नवि-१३, दिनांक १४ जुलै २०२१ अन्वये "पुणे महानगरपालिका हद्दीतील उक्त २३ गावांचे अविकसित क्षेत्र अधिसूचित करून अधिसूचित क्षेत्राकरिता "उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त केलेली आहे" ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वये प्रदान अधिकारांचा वापर करून उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने ठराव क्रमांक ३, दिनांक २९ जुलै २०२१ अन्वये उक्त २३ गावांचे अधिसूचित क्षेत्रांसह उक्त महानगर क्षेत्रासाठी तयार केलेल्या प्रारूप विकास योजनेस मान्यता दिली व सदर मान्यतेसाठी पुणे महानगर नियोजन समितीस सादर करण्यास मंजुरी दिली ;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगर नियोजन समितीने ठराव क्रमांक १, दिनांक २९ जुलै २०२१ अन्वये, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रारूप विकास योजनेस मंजुरी दिली व उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वये उक्त प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करणेस मंजुरी दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम २६ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २ ऑगस्ट २०२१ रोजी सदर महानगर क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा, तसेच सदर २३ गावांच्या अधिसूचित क्षेत्राचा जनतेच्या हरकती आणि सूचनांसाठी प्रकाशित केला आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३ ऑगस्ट २०२१ रोजीच्या त्यांच्या आदेशानुसार, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणासह इतर प्रतिवादींना प्रारूप विकास आराखड्याच्या उक्त प्रसिद्धीनंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकतींवर अंतिम कार्यवाही न करण्याचे आदेश जारी केले होते ;

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सभेत ठराव पारित केल्याप्रमाणे सदरील प्रारूप विकास आराखडा रद्द करण्यासंबंधी मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करणेबाबत निर्णय घेणेत आला ;

आणि ज्याअर्थी, सदर ठरावानुसार उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी मा. उच्च न्यायालयात संबंधित याचिका रद्द करण्याची मागणी करण्यासाठी अतिरिक्त शपथपत्र दाखल केले होते ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अतिरिक्त शपथपत्राचा विचार केल्यानंतर दिनांक १५ जुलै २०२५ रोजीच्या सुनावणीअंती आदेश पारित करून सर्व संबंधित याचिका फेटाळून लावल्या आहेत ;

आता त्याअर्थी, सदरील जाहीर सूचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० सहकलम २३, २६ आणि २८, तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण तरतुदी अधिनियम, १९०४ च्या कलम २१ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रारूप विकास आराखड्यासंबंधी खालील सूचना रद्द करून प्रारूप विकास योजना आराखड्याची प्रक्रिया मागे घेत आहे :--

१. उक्त अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत विकास आराखडा तयार करण्याचा इरादा जाहीर करणारी अधिसूचना.

२. उक्त अधिनियमाच्या कलम २६ अंतर्गत प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करणारी जाहीर अधिसूचना.

३. उक्त अधिनियमाच्या कलम २८ अंतर्गत सुरू केलेल्या सूचना / हरकती संबंधित सर्व कार्यवाही.

सदर सार्वजनिक सूचनेची प्रत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४११ ०४४ यांच्या कार्यालय परिसरात आणि पीएमआरडीएच्या अधिकृत वेबसाईट www.pmrda.gov.in वर जनतेच्या तपासणीसाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**डॉ. योगेश म्हसे,**
महानगर आयुक्त तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

पुणे, २६ सप्टेंबर २०२५.

---

**BY METROPOLITAN COMMISSIONER AND CHIEF EXECUTIVE OFFICER, PUNE METROPOLITAN DEVELOPMENT AUTHORITY, PUNE**

*Rescission of Notification and Actions under Section 40 read with Sections 23, 26 and 28 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 and Section 21 of the Maharashtra General Clauses Act, 1904.*

**NOTIFICATION**

क्रमांक पीएमआरडीए/नि.वि./प्र.क्र.७०५/२०२५.— Whereas, Pune Metropolitan Region Development Authority as per the provision of Section 23 of the said Act, had declared it's intention to prepare a Draft Development Plan of the said Metropolitan Area *vide* Resolution No. 2, dated 22nd June 2017 and Notice to that effect was published in Maharashtra Government Gazette, Part One-Pune Divisional Supplement, dated 6th July 2017 ;

and whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department Notification No. PMC-2020/C.R.-322/UD-22, dated 30th June 2021 has altered the limits of Pune Municipal Corporation by including the 23 villages (hereinafter referred to as "the said 23 villages") as mentioned in the Schedule-I appended therein ;

and whereas, in exercise of the powers conferred by Section 40 *(1)* and Section 40 *(1) (d)* of the said Act, the Government of Maharashtra declared area of the said 23 villages in the Pune Municipal Corporation limits, as mentioned in the Appendix-A appended thereto, to be notified area and the Region Development Authority was appointed as the Special Planning Authority for this notified area *vide* Notifications No. TPS-1821/1167/CR-98/2021/UD-13, dated 14th July 2021 ;

and whereas, in exercise of the power conferred by Section 26 of the said Act, the said Region Development Authority *vide* Resolution No. 3, dated 29th July 2021 has approved Draft Development Plan of the said Metropolitan Area alongwith notified area of the said 23 villages and granted approval to submit it to Pune Metropolitan Planning Committee.

and whereas, Pune Metropolitan Planning Committee *vide* Resolution No. 1, dated 29th July 2021 has approved the said Draft Development Plan, submitted by the said Region Development Authority and resolved to publish it under the provision of Section 26 of the said Act ;

and whereas, in exercise of the powers conferred by Section 26 of the said Act, the said Region Development Authority, dated 2nd August 2021 has published the Draft Development Plan of the said Metropolitan Area alongwith notified area of the said 23 villages for objections and suggestions from the public ;

and whereas, the Hon'ble High Court of Bombay *vide* it's Order dated 3rd August 2021 had issued directions restraining the Respondents including the said Region Development Authority not to Act in furtherance of suggestions / objections received after the aforesaid publication of the Draft Development Plan ;

and whereas, in view of the above the said Region Development Authority in it's meeting dated 12th February 2025, resolved to file affidavit before the Hon'ble High Court intimating intention to rescind the said Draft Development Plan ;

and whereas, in furtherance of the said Resolution, the said Region Development Authority filed an additional affidavit dated 9th April 2025 before the Hon'ble High Court of Bombay to place the above resolution of the Region Development Authority on record and thereby seeking dismissal of the Petitions ;

and whereas, the Hon'ble High Court, after considering the additional affidavit, passed an order dated 15th July 2025 observing that the matter had become infructuous and accordingly dismissed the Petitions.

Now therefore, in exercise of the powers conferred under Section 40 read with Sections 23, 26 and 28 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 and Section 21 of the Maharashtra General Clauses Act, 1904, the undersigned the Metropolitan Commissioner, PMRDA, hereby rescinds and withdraws the following :—

1. Notification declaring the intention to prepare a Development Plan under Section 23.

2. Notification publishing the Draft Development Plan under Section 26.

3. All public notices, communications or procedures initiated under Section 28, including those inviting suggestions and objections.

The Copy of the said Public Notice thereof is kept open for inspection of the public within the office premises of Pune Metropolitan Region Development Authority, Pune. New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-411044 and on official website of PMRDA *i.e.* **www.pmrda.gov.in.**

**DR. YOGESH MHASE,**
Metropolitan Commissioner
and Chief Executive Officer,
Pune Metropolitan Region Development Authority,
Pune.

Pune, 26th September 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI–400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.